प्रधान मंत्री
आवास योजना-ग्रामीण
Pradhan Mantri Awaas Yojana-Gramin

सर्वांसाठी घरे - 2022

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग

**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय**

सिडको भवन, ५ वा मजला, दक्षिण कक्ष, बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

दूरध्वनी क्र.०२२-२२८५०४७१ Email ID: directoriayruralhousing@gmail.com

जा.क्र./कावि/ आवास दिन/PMAYG-२/६६६/२०२० दिनांक : १६/ ११/२०२०

**प्रति,**

कार्यकारी अध्यक्ष,
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व).

**विषय :- दि. २० नोव्हेंबर रोजीचा 'आवास दिन' व दि. १६ नोव्हेंबर ते २२ नोव्हेंबर, २०२० या कालावधीत 'आवास सप्ताह' साजरा करणेबाबत.**

संदर्भ :- उप महा संचालक, भारत सरकार यांचेकडील पत्र नं. J-११०१२/०२/२०१६/RH, दिनांक १६/११/२०२०.

"प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण" ही योजना देशात "२० नोव्हेंबर २०१६" पासून सुरु करण्यात आली आहे. दरवर्षी २० नोव्हेंबर हा राष्ट्रीय "आवास दिन" म्हणून देशभर राबविण्यात येतो. "सर्वांसाठी घरे २०२२" हे केंद्र शासनाचे महत्त्वाचे धोरण असून राज्य शासनाने देखील या धोरणाचा स्वीकार केला आहे.

संदर्भिय पत्रान्वये दि. २० नोव्हेंबर रोजीचा 'आवास दिन' व दि.१६ नोव्हेंबर ते २२ नोव्हेंबर, २०२० या कालावधीत 'आवास सप्ताह' साजरा करणेबाबत ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी सूचना दिल्या आहेत. त्यानुषंगाने सदर आवास सप्ताह दरम्यान जिल्हास्तर/ तालुकास्तर/ ग्रामपंचायत स्तरावर पुढील प्रमाणे कार्यक्रम आयोजित करावेत.

१. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण संदर्भात लाभार्थ्यांना वितरीत केलेल्या हप्त्यांची संख्या, वेगवेगळ्या घरकुल डिझाईनची उपलब्धता, ग्रामीण गवंडी प्रशिक्षण कार्यक्रमाची जनजागृती आणि प्रशिक्षीत गवंड्यांची उपलब्धता इत्यादी बाबींची माहिती लाभार्थ्यांना देणे.
२. जिल्हा/ तालुक्यातील राबविलेले नाविन्यपूर्ण उपक्रम व आदर्श घरकुलांना लाभार्थ्यांच्या भेटीचे आयोजन करणे.
३. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत लाभार्थ्यांना रु.७०,०००/- चे **गृह** कर्ज मिळण्यासाठी स्थानिक बँकर्स समवेत संवाद आयोजित करणे.
४. ग्रामीण आवास योजनां मधील घरकुलांचे भूमिपूजन, गृह प्रवेश इत्यादी आयोजित करणे.

मार्च २०२० पासून सुरु झालेल्या कोरोना साथीच्या प्रार्दुभावामुळे तसेच शासकीय यंत्रणा कोविड-१९ च्या साथ निवारणासाठी व्यस्त असल्याने या कामाची गती मंदावली आहे. सध्या केंद्र शासन व राज्य शासनाने अनलॉकची प्रकिया सुरु केल्याने सर्व व्यवहार पूर्ववत होत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील घरकुलांच्या कामांना गती देणे आवश्यक आहे.

त्यानुषंगाने राज्यातील सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजना अधिक गतिमान करण्यासाठी खालील उपक्रमांवर देखील लक्ष केंद्रीत करण्यात यावेत.

१. भूमीहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देणे. (Land to Landless Beneficiaries)
२. घरकुलांच्या उद्दिष्टांप्रमाणे १०० टक्के मंजूरी देणे. (Closing Gap between Target and Sanction)
३. मंजूर घरकुलांना पहिल्या हप्त्याचे १०० टक्के वितरण करणे. (Closing Gap between Sanction and १$^{st}$ Instalment)
४. घरकुलांच्या उद्दिष्टानुसार १०० टक्के घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण (Closing Gap between Target & Completion) करणे.
५. प्रलंबित घरकुले (Delayed Houses) पूर्ण करणे.
६. सर्व घरकुले आर्थिकदृष्ट्या पूर्ण करणे. (Financial completion)
७. ग्रामीण गवंडी प्रशिक्षण (Rural Mason Training) पूर्ण करणे.
८. डेमो हाऊसेस (Demo House) उभारणे.
९. कायमस्वरुपी प्रतिक्षा यादीतील लाभार्थ्यांचे आधार सिडींग व आवास प्लस मधील लाभार्थ्यांचे आधार सिडींग / जॉब कार्डमॅपिंग १०० टक्के पूर्ण करणे. (Aadhar Seeding of PWL & Awaas Plus / Job Card Mapping)
१०. शासकीय योजनांशी कृतीसंगम (Convergence) व नावीन्यपूर्ण उपक्रमांची (Innovative / Best Practices) अंमलबजावणी करणे.

तरी जिल्हास्तर/ तालुकास्तर/ ग्रामपंचायत स्तरावर दि. २० नोव्हेंबर रोजीचा ‘आवास दिन’ व दि.१६ नोव्हेंबर ते २२ नोव्हेंबर, २०२० या कालावधीत उपरोक्त उपक्रम राबवून ‘आवास सप्ताह’ साजरा करण्यात यावा. सदर कार्यक्रमाचे फोटो, ऑडिओ, व्हिडिओ, वृत्तपत्र कात्रणे व अहवाल या कार्यालयास सादर करावेत.

**(डॉ. राजाराम दिघे)**
**संचालक**
**राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण**
**महाराष्ट्र राज्य**

**प्रत :-**

१. मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग व पंचायत राज विभाग, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व) यांना माहितीस्तव सादर.
३. उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीस्तव.
४. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीस्तव.